जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR 2018
सकाळ

# डॉ. संवाद यांचे सोमवारी व्याख्यान

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाच्या आर. एन. गोडबोले अध्यासनातर्फे सोमवारी (ता. १२) आर. एन. गोडबोले स्मृती व्याख्यानमालेत चंदिगडच्या स्टेट बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे प्रा. डॉ. एस. एस. संवाद यांचे व्याख्यान होत आहे. मानव्यशास्त्र सभागृहात दुपारी बारा वाजता त्यास सुरवात होईल. डॉ. संवाद ''ग्रामीण पतपुरवठ्याचा दृष्टिकोन आणि ग्रामीण गरिबांचे वित्तीय समावेशन'' विषयावर व्याख्यान देणार आहेत. व्याख्यानास उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR 2018
लोकमत

# विद्यापीठामध्ये सोमवारी व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दि युनायटेड वेस्टर्न बँकेच्या आर. एन. गोडबोले अध्यासनातर्फे सोमवारी (दि. १२) दुपारी बारा वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आर. एन. गोडबोले स्मृती व्याख्यान आयोजित केले आहे. यात चंदीगढच्या स्टेट बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे प्रा. डॉ. एस. एस. संगवान हे 'ग्रामीण पतपुरवठ्याचा दृष्टिकोन आणि ग्रामीण गरिबांचे वित्तीय समावेशन' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, तर प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के हे प्रमुख उपस्थित असतील, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR 2018
तरुण भारत

# विद्यापीठात सोमवारी आर. एन. गोडबोले स्मृती व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दि युनायटेड वेस्टर्न बँकेच्या कै.आर.एन गोडबोले अध्यासनाच्यावतीने कै.आर.एन.गोडबोले स्मृती व्याख्यानाचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये सोमवार (१२) रोजी दुपारी १२ वाजता हे व्याख्यान होणार आहे. यावेळी चंदिगडच्या स्टेट बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे प्रा. डॉ. एस. एस. संगवान हे 'ग्रामीण पतपुरवठ्याचा दृष्टीकोन आणि ग्रामीण गरीबांचे वित्तीय समावेशन' या विषयावर व्याख्यान देणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
1 0 MAR 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे आज व्याख्यान

कोल्हापूर : विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे उद्या (ता. १०) 'लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे जीवन व कार्य' यावर प्रा. आत्माराम थोरात यांचे इतिहास अधिविभागात सकाळी ११.३० वाजता व्याख्यान होणार असल्याची माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनीश पाटील यांनी दिली. डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी, तर आमदार शंभूराजे देसाई यांची प्रमुख उपस्थिती आहे.

